**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३१२८ दि. २९ /०९ /२०१९**

## प्रेसनोट दि. २९/०९/२०१९

### वाघाचे कातडे विक्री करणारे २ आरोपी युनिट-१ गुन्हे शाखा यांचेकडून अटक

दिनांक २८/०९/२०१९ रोजी गुन्हे शाखा, युनिट-१, पुणे शहर यांचेकडील अधिकारी व कर्मचारी हे खाजगी वाहनाने युनिट-१ च्या हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना, पोना सचिन जाधव यांना बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, दोन इसम वाघाचे कातडे विक्री करण्यात करता ए डी कॅम्प चौकात येणार आहे अशी खात्रीशीर बातमी प्राप्त झाल्याने सदर बातमीचा आशय वरिष्ठांना कळवुन त्यांनी सदर बाबत योग्य ते मार्गदर्शन करुन कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिल्याने आम्ही वरील स्टाफच्या मदतीने सदर ठिकाणी जावुन बातमीप्रमाणे अचानक छापा घालुन दोन इसमास ताब्यात घेऊन त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारता त्यांनी त्यांचे नाव रामेश्वर हरिश्चंद्र देशमुख, वय ३५ वर्षे, रा. मु. पो. लासुर स्टेशन, नवीन बाजार गल्ली, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद व २) विजय गणपत जगताप, वय ३८ वर्षे, रा. मु. भागाठाण, पो. महिबुबखेडा, ता. गंगापुर, जि औरंगाबाद असे असल्याचे सांगितले त्याची अंगझडती घेतली असता त्याचे ताब्यातील सॅकची पहाणी केली असता त्यामध्ये एक वाघाचे कातडे किमंत ५,००,०००/- रु मिळुन आले त्यास सदर वाघाचे कातडे बाबत विश्वासात घेवुन विचारपुस केली असता, त्याने सदरचे वाघाचे कातडे हे विक्री करणे करीता आणले असल्याचे सांगितले. सदरचे वाघाचे कातडे व त्यांचे ताब्यातील हॉन्डा शाईन मोटार सायकल असा मुद्देमाल पोलीस उपनिरीक्षक श्री लहु सातपुते यांनी पंचासमक्ष पंचनाम्याने जप्त करुन ताब्यात घेतले तसेच वाघाच्या कातडयाबाबत फॉरेस्ट विभागाचे अधिकारी यांच्याशी संपर्क साधुन वनरक्षक चंद्रकांत बाबासाहेब शिंदे पुणे रेंज यांना पाठविले त्यांनी समक्ष येवून पाहुन सदरचे वाघाचे कातडेच असल्याचे व ते वन्यजीव प्राणी संरक्षण कायदा १९७२ चे शेड्युल १ मधील असल्याचे समक्ष सांगितले आहे. तसा सविस्तर पंचनामा करुन दोन्ही इसमांविरुध्द समर्थ पोलीस ठाणे येथे वन्यजीव संरक्षण कायदा सन १९७२ चे कलम ९, ४४, ५१ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे श्री अशोक मोराळे, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री बच्चन सिंह, यांचे मार्गदशनाखाली युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्री. अरुण वायकर, पोलीस उप निरीक्षक लहु सातपुते व यश बोराटे पोलीस कर्मचारी सपोफौ वसावे, सचिन जाधव, अमोल पवार, सुधाकर माने, तुषार माळवदकर, सुभाष पिंगळे, अरविंद चव्हाण यांनी केली आहे.